आत्मदीपो भव !

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण



आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

| | |
|---|---|
| देवेंद्र फडणवीस | अध्यक्ष |
| डॉ. विनय सहस्रबुद्धे | उपाध्यक्ष |
| विजय (भाई) गिरकर | सचिव |
| अरविंद रेगे | कोषाध्यक्ष |
| प्रा. अनिरुद्ध देशपांडे | सदस्य |
| वी. सतीश | सदस्य |
| रेखा महाजन | सदस्य |
| रामस्वामी बालासुब्रमण्यम | सदस्य |
| श्रीकांत बडवे | सदस्य |
| सुधीर मेहता | सदस्य |
| प्रदीप पाण्डेय | सदस्य |
| | |
| डॉ. जयंत कुलकर्णी | कार्यकारी संचालक |

# व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण

## समाजातील विविध क्षेत्रांतील अनेक घटकांसाठी

### प्रबोधिनीविषयी :-



रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधन या त्रिसूत्रीसह मागील ४२ वर्षे प्रामुख्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते - पदाधिकारी, शिक्षण संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, संस्थाचालक, महाविद्यालयीन तरुण, वकील, डॉक्टर, विविध क्षेत्रातील महिला, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक इत्यादी सर्व समाज घटकांच्या व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व क्षमता विकासासाठी प्रबोधिनी कार्यरत आहे. या सर्व घटकांसाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी दर्जेदार आणि सकस प्रशिक्षण कार्यक्रम योजते. विविध क्षेत्रांतील संस्था-संघटनांतील कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यापासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत हजारो सहभागींनी प्रबोधिनीच्या व्यक्तिविकासात्मक प्रशिक्षण कार्यक्रमांतून प्रेरणा घेतली आहे. केशवसृष्टी, उत्तन येथील निसर्गसुंदर, अत्याधुनिक आणि सुसज्ज ज्ञान – नैपुण्य केंद्र हे तर म्हाळगी प्रबोधिनीचे प्रमुख वैशिष्ट्य! प्रशिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास आणि क्षमता संवर्धन घडवणारी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही अभिनव संस्था आहे. विविध व्यक्तिविकासात्मक-सामाजिक-राजकीय विषयांबाबत मान्यवर तज्ज्ञ आणि अनुभवी अभ्यासक यांचे प्रेरक आणि दिशादर्शक मार्गदर्शन हे म्हाळगी प्रबोधिनीचे बलस्थानच आहे.

### पार्श्वभूमी :-

समाजजीवनाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यातील कार्यक्षम मनुष्यबळासाठी 'प्रशिक्षण हा एक महत्त्वाचा घटक' ठरतो. सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक राजकीय इत्यादी क्षेत्रांत प्रशिक्षित मनुष्यबळ अत्यावश्यक आहेच. व्यक्तीचा विकास आणि समाजाचा किंवा देशाचा सर्वांगीण विकास या एकमेकांशी जोडलेल्या गोष्टी आहेत. वैयक्तिक प्रगतीसाठी वागण्या-बोलण्याच्या रीतीपासून ते अद्ययावत कौशल्ये आत्मसात करण्यापर्यंतचे प्रशिक्षण गरजेचे असते. त्याचबरोबर एक उन्नत समाज निर्माण होण्यासाठी विकसित व्यक्तिमत्त्वाला कार्यालयीन कामातील व्यावसायिकता, सार्वजनिक कार्यांतील नियोजनबद्धता आणि सामाजिक व सांस्कृतिक भान अशा अनेक घटकांची जोड देणे गरजेचे असते.

### प्रशिक्षणाचे स्वरूप :-

- वैचारिक, कार्यात्मक आणि कौशल्य विकासात्मक प्रशिक्षण
- आत्मविश्वास वाढवणारे आणि प्रेरणा व दिशा देणारे प्रशिक्षण
- व्यक्तिमत्त्व आणि समाज यांविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणारे प्रशिक्षण
- प्रशिक्षण वर्ग / शिबिरांचा कालावधी – २ किंवा ३ दिवस
- एका तुकडीत ३५ ते ५० सहभागी संख्या

## प्रशिक्षण कोणासाठी :-

- सामाजिक / स्वयंसेवी किंवा सांस्कृतिक संस्था - संघटनांचे कार्यकर्ते - पदाधिकारी
- राजकीय पक्षांच्या विविध स्तरांवरील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी
- शालेय व उच्च शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक, शिक्षकेतर कर्मचारी
- महाविद्यालयीन विद्यार्थी, वकील, डॉक्टर्स, खाजगी नोकऱ्या करणारे, छोटे - मोठे उद्योजक
- कालसुसंगत, व्यक्तिमत्त्व विकासात्मक प्रशिक्षण घेण्यास उत्सुक असलेले सर्व







# व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण

कोणतेही क्षेत्र असो, वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे. व्यक्तिमत्त्व विकास साधायचा असेल, तर वक्तृत्व आणि संवादकौशल्ये या कला आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. विविध क्षेत्रांसाठीची संवाद कला आणि वक्तृत्वाची साधना यांबाबत प्रबोधिनीत गेली अनेक वर्षे अतिशय दर्जेदार प्रशिक्षण दिले जाते.

राजकीय क्षेत्रात आपले नेतृत्व प्रभावीपणे प्रस्थापित करायचे असेल, तर वक्तृत्वकलेच्या प्रशिक्षणाला पर्याय नाही. विशेषतः राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या वक्तृत्वविषयक गरजा वेगळ्या असतात. हे लक्षात घेऊन प्रबोधिनीत राजकीय भाषणकला प्रशिक्षण शिबिरे स्वतंत्रपणे योजली जातात. मूळ वाचनापासून ते देहबोलीपर्यंतच्या सर्व महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाते.

## १. वक्तृत्वकला आणि संवाद कौशल्ये प्रशिक्षण

### सत्रांचे विषय :

- वाचन आणि व्यासंग
- उच्चारशास्त्र आणि आवाजाची जोपासना
- वक्तृत्वकलेची साधना आणि भाषणाची पूर्वतयारी
- भाषण बेतावे कसे?
- भाषण करावे कसे?
- संवाद कौशल्ये आणि देहबोली
- निवेदन आणि सूत्रसंचालन
- YouTube आणि पॉडकास्टवरील संवाद
- निवडक भाषणांची चित्रफित
- प्रात्यक्षिके सराव सादरीकरण

## २. राजकीय भाषणकला प्रशिक्षण

### सत्रांचे विषय :

- राजकीय संदर्भातील वाचन आणि व्यासंग
- राजकीय पक्षांचा इतिहास
- भाषणकलेची साधना आणि भाषणाची पूर्वतयारी
- उच्चारशास्त्र आणि आवाजाची जोपासना
- भाषण बेतावे कसे आणि करावे कसे?
- संवादकौशल्ये आणि देहबोली
- YouTube च्या माध्यमातून राजकीय संवाद
- निवडक भाषणांची चित्रफित
- प्रात्यक्षिके, सराव - सादरीकरण





## ३. निवेदन आणि सूत्रसंचालन प्रशिक्षण

निवेदन आणि सूत्रसंचालन हा वक्तृत्व कलेचा एक वेगळा पैलू!
साहित्य-संस्कृती- कला यांत रस असणाऱ्यांना याबाबतचे प्रशिक्षण उपयुक्त ठरते. एखाद्या संगीत मैफिलीचे निवेदन किंवा कोणत्याही जाहीर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यांमधील नेमक्या गरजा ओळखून संबंधित विषयांवर तज्ज्ञ आणि सुप्रसिद्ध निवेदक व सूत्रसंचालक प्रबोधिनीतील प्रशिक्षण वर्गांत मार्गदर्शन करतात. अशा प्रकारचा वर्ग प्रबोधिनीत गेली अनेक वर्षे यशस्वीपणे योजला जात आहे.

### सत्रांचे विषय :

- उच्चारशास्त्र आणि आवाजाची जोपासना
- वाचन आणि व्यासंग
- निवेदन आणि सूत्रसंचालन या कलांची तोंडओळख, तंत्र आणि मंत्र
- संवाद कौशल्ये आणि देहबोली
- भाषणकला
- संहिता लेखन
- प्रात्यक्षिके, सराव - सादरीकरण







# ४. नेतृत्व विकास प्रशिक्षण

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा खाजगी नोकरी, व्यापार-उद्योग यांपैकी कोणत्याही क्षेत्रात संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीकोनातून यशस्वी व्हायचे असेल, तर व्यक्तिमत्त्व विकास अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर कोणत्याही क्षेत्रातील यशाची शिखरे गाठायची असतील, तर नेतृत्व गुण आत्मसात करणे आवश्यक आहे. हाच दृष्टीकोन ठेवून प्रबोधिनीत नेतृत्व विकासासाठी आवश्यक असलेले ज्ञान व माहिती आणि कौशल्ये यांचे प्रशिक्षण दिले जाते.

## सत्रांचे विषय :

- नेतृत्व साधना
- संवाद कौशल्ये
- भाषणकला
- भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास
- उद्योजकता आणि व्यावसायिकता.
- समाजमाध्यमांचा प्रभावी वापर
- प्रसारमाध्यमांचे विश्व
- भारतातील आणि महाराष्ट्रातील महत्त्वाच्या सामाजिक समस्या (समाजभान)
- राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि वैश्विक राजकारण (Geo Politics)
- नेतृत्व क्षमता : सर्वांगीण आकलन आणि प्रगल्भता.
- भारतीय संस्कृती आणि परंपरा / भारतीय ज्ञान पद्धती (BKS)







# ५. समाजभान

व्यक्ती आणि समाज हे परस्परांशी निकटचा संबंध असलेले घटक असल्याने व्यक्तिमत्त्व विकास ही प्रक्रिया समाजाशी जोडलेलीच असते. त्यामुळेच आपण राहतो, वावरतो त्या समाजाचे सर्वांगीण भान असणे, ही व्यक्तिविकासातील महत्त्वाची पायरी ठरते. या पार्श्वभूमीवर संस्कृती, जीवनमूल्ये, इतिहास, शेती, पर्यावरण, जीवनशैली, राष्ट्रीय सुरक्षा अशा विविध विषयांवर 'समाजभान' देणाऱ्या कार्यशाळेत मार्गदर्शन केले जाते.

## सत्रांचे विषय :

- आपली सामाजिक जबाबदारी आणि उत्तरदायित्व
- सामाजिक सुधारणांचा इतिहास
- भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास – स्वातंत्र्याचे मूल्य
- राज्यघटना आणि राजकीय व प्रशासकीय संरचना
- जीवनमूल्ये : राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-पुरुष समानता ...इ.
- आपली जीवनशैली आणि समाजभान
- माहितीचा अधिकार
- समाजमाध्यमांचा नियंत्रित वापर
- पर्यावरण संवर्धन
- कृषी क्षेत्राचा परिचय
- राष्ट्रीय सुरक्षा – महत्त्व आणि जाणीव
- अभिरूची जोपासना ( प्रामुख्याने वाचन, चित्रपट आणि संगीत )
- नावीन्यपूर्ण उद्योजकता आणि व्यावसायिकता











## ६. अभिरूची जोपासना कार्यशाळा

कलासाक्षर आणि अभिरूची संपन्न समाज हे प्रगत आणि उन्नत समाजाचे प्रमुख लक्षण आहे. अभिरूची संपन्न समाजाच्या निर्मितीसाठी आनंदी आणि समाधानी मनांसह कलांचा आस्वाद घेणारी व्यक्तिमत्त्वे तयार होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर विविध कलांची जवळून ओळख करून देण्यासाठी आणि साधा माणूस ते कलासक्त रसिक या प्रवासाचा चैतन्यमय अनुभव देण्यासाठी अभिरूची जोपासना कार्यशाळा योजण्यात येते. जगणं अधिक समृद्ध करणाऱ्या या कार्यशाळेत त्या-त्या कलाक्षेत्रातील दिग्गज मान्यवर मार्गदर्शन करतात.

### सत्रांचे विषय :

- अभिरूची संपन्नता कशासाठी?
- मैत्री पुस्तकांशी
- शास्त्रीय संगीताचा 'कान तयार' करणे
- चित्रपट पाहण्याची दृष्टी
- चित्रपट संगीत : अनुभव आणि आनंद
- नाटक समजून घेताना...
- रसिक नजरेतून चित्रकला
- शिल्पकला : निर्जीवातील जिवंतपणा
- ओळख नृत्यकलेची
- लोककलांची समृद्ध परंपरा


















आत्मदीपो भव !

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

## Rambhau Mhalgi Prabodhini

### आमची उपलब्ध प्रकाशने

| प्रकाशनाचे नाव | लेखक | किंमत रुपये |
|---|---|---|
| संघटनशास्त्र ( सहावी आवृत्ती ) | संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे | १५०.०० |
| असू अम्हीसुखाने पत्थर पायातील ... | सुहास वैद्य | १००.०० |
| मर्यादांवर मात करू !<br>विद्यार्थ्यांमधील शारीरिक आणि मानसिक अक्षमतांचे व उपायांचे विवेचन | क्षिप्रा रोहित | ५०.०० |
| अध्ययन अक्षमता - समजून घेताना | क्षिप्रा रोहित | ५०.०० |
| कर्णबधिरत्व - उपायांतून उमेदीकडे | क्षिप्रा रोहित | ५०.०० |
| उत्तम शेती | विकास मुरलीधर राजर्षी | १००.०० |
| समीक्षा – संचित<br>(निवडक इंग्रजी ग्रंथांच्या परीक्षणांचे संकलन ) | लेखक : ज. द. जोगळेकर<br>संपादन : रवींद्र साठे | ३००.०० |
| नागरिकत्व सुधारणा कायदा – २०१९<br>भ्रम आणि वास्तव | अतुल भातखळकर | १०.०० |
| आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम | मधुबन पिंगळे | ६०.०० |
| बाळासाहेब देवरस : कर्तृत्व आणि विचार | भय्याजी जोशी | २५.०० |
| भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ?<br>( आवृत्ती : हिंदी / इंग्रजी ) | अमित शाह | २५.०० |
| राजनीति के उस पार ( चतुर्थ आवृत्ती ) | संपादन : सुधीर नादगांवकर | १५०.०० |
| संगठन कौशल ( तृतीय आवृत्ती ) | संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे | १५०.०० |
| सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी | अमित शाह | ६०.०० |
| **Al-Qaeda (Global Terror Incorporated)** | Sudhakar Raje | ५०.०० |
| **Left Front Rule in West Bengal :<br>( Genesis, Growth and Decay )** | Dr. Ashok Modak<br>Atul Bhatkhalkar- | ४०.०० |
| **Development and Internal Security in Chhattisgarh :<br>Impact of Naxalite Movement** | | ३०.०० |
| **Creativity In Cooperation<br>( Four Success Stories)** | Niranjan Welankar<br>Ravi Pokharna | ४०.०० |
| **War On Terrorism<br>( A Compilation of Seminar Papers)** | Editor :Ravindra Sathe<br>Milind Arolkar | ३०.०० |
| **Understanding Human Computer :<br>System and Software** | Arvind Bhaskar Rege | १२०.०० |
| **Including The Excluded<br>(A Study of the Impact of Contract Labour Act 1970)** | S. M .Dharap | १५०.०० |
| **The National Cause :<br>(selected writings of S. G. Majgaonkar)** | Translation : Anand Agashe | २००.०० |
| **Architects Of Cultural Nationalism** | Amit Shah | ६०.०० |


### मुंबई कार्यालय

१७, चंचल स्मृती, गं. द. आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्टीयल इस्टेट समोर,
वडाळा, मुंबई - ४०००३१.
दूरध्वनी :
०२२-२४१८५५०२, २४१३६९६६

### ज्ञान-नैपुण्य केंद्र

केशव सृष्टी, एस्सेल वर्ल्ड रोड,
उत्तन, भाईंदर (पश्चिम),
जि. ठाणे - ४०११०६.
दूरध्वनी :
०२२-२८४५०१०१/ ०२/ ०३

### पुणे कार्यालय

६२६, नारायण पेठ,
लोखंडे तालमीजवळ,
पुणे - ४११०३०.
दूरध्वनी :
०२०-२४४७३२७१

### दिल्ली कार्यालय

१३६, नॉर्थ एरहेन्यू,
नवी दिल्ली - ११०००१.
दूरध्वनी :
९१-११-२३०९२०३२

श्री. विनय वसंत मावळणकर,
वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी
(9096548250, vinaym@rmponweb.org)

श्री. अनिल पांचाळ,
साहाय्यक कार्यक्रम अधिकारी
(9975415922, anilp@rmponweb.org)